मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल
बातमी व जाहिरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२


# केंद्र प्रमुखांना शिक्षण विभागाचा दिलासा!

## पदोन्नतीसाठी वय आणि गुणांची अट रद्द; आ. महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

शिक्षण विभागातील केंद्र प्रमुखांच्या भरतीसाठी ५० वर्षे वयोमर्यादा आणि ५० टक्के गुणांची ठेवलेली अट रद्द करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यामुळे या भरतीपासून वंचित राहणार्यांना दिलासा मिळाला आहे. तर ही जाचक अट रद्द व्हावी, यासाठी आमदार महेश लांडगे यांनी शिक्षण मंत्र्यांसह संबंधीत अधिकार्यांकडे पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला होता. त्याला अखेर यश आले आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत ५ जून २०२३ रोजी केंद्रप्रमुख विभागीय स्पर्धा परीक्षा घेण्यासाठी जाहिरात निर्गमित झाली आहे. केंद्रप्रमुख पदे ही पदोन्नतीने कार्यरत प्रशिक्षित पदवीधर प्राथमिक शिक्षकांमधून सेवाज्येष्ठता ५० टक्के व मर्यादित विभागीय परिक्षेने ५० टक्के भरण्याच्या अनुषंगाने निर्णय घेतला होता. परंतु गेल्या ७९ वर्षात ही पदे कोणत्याच पद्धतीने न भरल्याने आता परीक्षेसाठी कमाल ५० वर्षे वयोमर्यादा व पदवीला ५० टक्के गुणांची अट ठेवल्याने अनेक सेवाज्येष्ठ, अनुभवी, राज्य राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक पात्रता असूनही केंद्रप्रमुख विभागीय परीक्षेला बसण्यापासून वंचित राहणार होते. या निर्णयाबाबत राज्यातील शिक्षकांमध्ये नाराजी होती. शिवाय कोविड मध्ये दोन वर्षे गेल्याने अनेकांची वयोमर्यादा ओलांडल्याने परीक्षा देता आल्या नाही.या बाबत महाराष्ट्र राज्य पदवीधर, प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख संघटनेच्या वतीने समान न्याय समान संधी या तत्वानुसार राज्य सरकारकडे मागण्यांसाठी निवेदन देण्यात आली होती. सर्व शिक्षकांना परीक्षेतून गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी संदर्भीय १ च्या नमूद परीक्षेला बसण्यासाठीच्या



पात्रता निकषातील वयाची अट रद्द करावी. परीक्षेला पदवीच्या ५० टक्के गुणांची अट नसावी. विषयानुसार केंद्रप्रमुख भरती अट रद्द करावी. राज्यातील सर्व जिल्हा परिषद प्रशासनाला पदोन्नतीची ५० टक्के रिक्त केंद्रप्रमुख पदे तातडीने भरण्यासाठी आदेश निर्गमित करण्याची मागणी केली होती.

तसेच, या बाबत आमदार महेश लांडगे यांनी देखील शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्याकडे १ जून २०१३ रोजी निवेदनाद्वारे पाठपुरावा केला होता. आ. लांडगे यांनी निवेदनात नमूद केले होते की, केंद्रप्रमुख विभागीय स्पर्धा परीक्षा घेण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदरील जाहिरात ही शासनाने घेतलेल्या मर्यादित विभागीय परिक्षेच्या माध्यमातून ५० टक्के पदे भरण्याच्या अनुषंगाने आहे. परंतु परीक्षेसाठी पात्रता निकष म्हणून कमाल ५० वर्षे वयोमर्यादा व पदवीला ५० टक्के गुणाची अट ठेवल्याने अनेक सेवाज्येष्ठ, अनुभवी, राज्य / राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक पात्रता पास असूनही केंद्रप्रमुख विभागीय परीक्षेत बसण्यापासून वंचित राहणार आहेत.

> केंद्रप्रमुख विभागीय मर्यादित परीक्षा व पदोन्नती बाबत आज सुधारित शासन निर्णय निर्गमित झाला आहे. याकामी महाराष्ट्र राज्य पदवीधर शिक्षक संघटनेच्या वतीने सातत्याने पाठपुरावा सुरू होता. तसेच मंत्रालय आणि प्रशासकीय पातळीवर भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे यांच्या सहकार्याने पाठपुरावा सुरू होता. दोन्हीच्या प्रयत्नांना यश मिळाले आहे.
>
> – मनोज मराठे, राज्य सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य पदवीधर, प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख संघटना.

# निवडणूक प्रक्रियेत विरोधकांचा व्यत्यय!

## हिंजवडीच्या राजकारणात गुवाहटीचा प्रत्येय!

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

आयटी नगरी हिंजवडीची खुर्ची ताब्यात ठेवण्यासाठी महिन्याभरापासून गाव कारभाऱ्यात सुरू असलेली चुरस व डाव- प्रतिडावांना अखेर पूर्ण विराम मिळाला. तणावपूर्ण वातावरणात सरपंचपदाची निवडणुक प्रक्रिया पार पडली. या प्रतिष्ठेच्या निवडणुकीत अखेर गणेश जांभूळकर यांनी ९ विरुद्ध ७ आशा मताधिक्याने बाजी मारत पंचवार्षिकमध्ये दुसऱ्यांदा सरपंचपदी विराजमान होण्याचा बहुमान मिळवला. उपस्थित १६ सदस्यांमध्ये गुप्त मतदान घेण्यात आले. यात गणेश जांभुळकर यांना ९ तर मयूर साखरे यांना ७ मते मिळाली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून हेमंत नायकवडी यांनी तर सहायक म्हणून प्रभारी ग्रामविकास अधिकारी बी.आर. पाटील व तलाठी सागर शेलार यांनी कामकाज पाहिले. सरपंच पदासाठी सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात मोठी चुरस असताना अनेक शह-कटाशहानंतर सत्ताधारी ग्रामदैवत श्री म्हातोबा परिवर्तन पॅनेलने सरपंचपद राखले. त्यामुळे ग्रामदैवत म्हातोबा देवाचा कौल सत्यालाच मिळाल्याची भावना विजयी पॅनलमधील ज्येष्ठांनी व्यक्त केली. निवडणुकीनंतर नवनिर्वाचित सरपंच व सत्ताधारी सदस्यांचे अभिनंदन करण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालय आवारात मोठी गर्दी झाली होती. माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेश निकाळजे, काँग्रेसचे नेते दिलीप हुलावळे, माजी संचालक वसंत साखरे, माजी उपसरपंच तानाजी हुलावळे, हिरामण साखरे, गणेश बोरकर, दत्तामामा वाकळे, बाळासाहेब पिंजन, उमेश साखरे, प्रवीण जांभुळकर, कृष्णा बुचडे, श्रीकांत नवले, यशवंत साखरे, कुंडलिक जांभुळकर, निलेश जाधव यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित होते.

